
पद्यपाठ २

**अभंगवाणी  संत तुकाराम**

ठळक मुद्दे-




**अभंग २**

**न देखावे डोळा ऐसा हा आकांत | परपीडे चित्त दुखी: होते ||१||**

**काय तुम्ही येथे नसालसे झाले | आम्ही न देखिले पाहिजे ते ||२||**

**परचक्र कोठे हरिदासांच्या वासे | न देखिजेत देशे राहातिया ||३||**

**तुका म्हणे माझी लाजविली सेवा | हिनपण देवा जिणे झाले ||४||**

**अभंग २ –अर्थ:**

**दुस-यांचे हे दु;ख आता पाहवत नाही,सहन होत नाही,. त्यामुळे मन अतिशय दु:खी होत आहे.(१)**

**तुम्ही अशा परिस्थितीमध्ये इथे नाही आणि आम्हांला ही परिस्थिती बघवतही नाही.(२)**

**परमेश्वर भक्तांच्या गावात आलेले हे परकीयांचे आक्रमण पाहवत नाही, येथे राहण्यासारखे वाटत नाही.(३)**

**संत तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत मी जी तुझी भक्ती केली तिची विटंबना झाली आहे. असे दीनवाणे जगणे जगावे लागत आहे.(४)**

**भावार्थ–**

मुलांनो तुम्ही आधी जो अभंग वाचला आणि समजून घेतला त्यापेक्षा हा अभंग थोडा वेगळा आहे हं! प्रयत्नांची फळे गोमटी सांगणारे संत तुकाराम एक माणूस म्हणून परकीय आक्रमणाने किती व्यथित होतात त्याचं दर्शन ह्या अभंगातून होतं. परकीय आक्रमणामुळे जीवन असुरक्षित झालं होतं. एव्हढंच नव्हे तर आपल्या सांस्कृतिक, धार्मिक जीवनावर घालाच पडला होता.ह्या वस्तुस्थितीचं वर्णन संत तुकाराम देवाला करतात. आपल्या अस्वस्थ मनाची दशा ते अजून कोणाला सांगणार? तर अर्थातच परमेश्वराला. कारण तुकारामांना परमेश्वराशिवाय कोणाचीच आस वाटत नाही. त्या परमेश्वरापाशीच ते आपली खंत व्यक्त करतात. ह्या दोन्ही अभंगातून, तुकाराम महाराजांच्या संत आणि माणूस म्हणून असलेल्या दोन बाजू आपल्यासमोर येतात.

**संत तुकारामांची भाषाशैली—**

आत्तापर्यंत अभंग या काव्यप्रकाराचा तुम्हाला परिचय झाला असेल. पण मराठी साहित्यात ‘अभंग तुकयाचा’ असे म्हणण्याचा प्रघात आहे. इतके संत तुकारामांचे अभंग प्रसिद्ध आहेत. येथिल अभंगांची रचना दोन चरणांची आहे. म्हणून हे ‘छोटे अभंग’ आहेत. साधी पण अर्थपूर्ण अशी रचना आहे.

दृष्टांन्त अलंकाराच्या माध्यमातून विषय सोपा केला आहे.

भावनेची आर्तता दिसते. संवाद साधण्याची शैली दिसून येते.

संतत्वाची व कवीची अशा दोन्ही भूमिकांच्या मुळे अभंग रसपूर्ण झाले आहेत

तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप दिसून येते.

दुस-या अभंगातून तत्कालीन सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन होते.

**स्वाध्याय-**

**उजळणी/सराव प्रश्न**

१. खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

**अ.** परचक्र कोठें हरिदासाच्या वासें | न देखिजेत देशें राहातिया